# N.S.S Regular Activity Report 2022-23

R.C.Patel Educational Trust's

**R. C. Patel Arts Commerce and Science College, Shirpur**

N.S.S.

Programme officer
National Service Scheme
.C.Patel Arts,Com.&Sci.Colle
Shirpur, Dist.Dhule

**Prof. R.M.Suryawanshi** — N.S.S.P.O.

**Dr.D.R.Patil** — Principal

R.C.PATEL EDUCATIONAL TRUST

आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्टचे

# आर.सी.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर

# राष्ट्रीय सेवा योजना

# नियमित कार्यक्रम अहवाल

# २०२२–२३

Programme officer
National Service Scheme
R.C. Patel Arts, Com. &Sci. College
Shirpur, Dist. Dhule

प्रा.आर.एम.सूर्यवंशी
रा.से.यो.कार्यक्रम अधिकारी

डॉ.डी.आर.पाटील
प्राचार्य

**आर.सी.पटेल एज्युकेशनल ट्रस्टचे**

**आर.सी.पटेल कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर जि.धुळे**

**शैक्षाणिक वर्ष २०२२-२३ अंतर्गत नियमित कार्यक्रमाचा वार्षिक अहवाल**

## (राष्ट्रीय सेवा योजना)

शैक्षाणिक वर्ष २०२२-२३ ला महाविद्यालयात रा.से.यो.साठी २५० विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला. या चालू शैक्षाणिक वर्षी २०२२-२३मध्ये **पत्र क्रमांक जा.क्र कबचौउमवि/१४-क/रा.से.यो/अहवाल/४०/२३४/२०२३च्या दिनांक१५/०३/२०२३.** अन्वये......

शैक्षाणिक वर्ष २०२२-२३ एकुण २५० विद्यार्थ्यांना रा.से.यो.त प्रवेश देण्यात आला.त्यात प्रथम वर्षाला १०८ आणि दुसऱ्या वर्षाला १४२ विद्यार्थ्यांना प्रवेश दिला. १२४ विद्यार्थ्यांनी बाळदे येथे हिवाळी शिबिरात भाग घेतला होता. वरील उल्लेख असलेल्या पत्रात विशेष हिवाळी शिबिरासाठी १२५ विद्यार्थ्यांना परवानगी दिलेली आहे. रा.से.यो

च्या २५० विद्यार्थ्यांमध्ये १५२ मुले आणि ९८ मुली आहेत. या शैक्षणिक वर्षाचा नियमित कार्यक्रमांचा अहवाल थोडक्यात देत आहोत.विद्यापीठाने सुचवलेल्या मार्गदर्शन पुस्तिकेतील मार्गदर्शक तत्वे व महाविद्यालयातील उद्धीष्टे डोळ्यासमोर ठेवून प्रथमत: सल्लागार समिती गठीत करण्यात आली. प्राचार्य डॉ.डी.आर.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सल्लागार समिती मार्फत वार्षिक दिनदर्शिका बनवून वार्षिक कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली."ग्राम-शहरी विकास"उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी आपले श्रमदानाचे गाव बाळदे येथे जाऊन ४० विद्यार्थांनी श्रमदान पूर्ण केले.यात गावात स्वच्छतेचे महत्व, ग्रामस्वच्छता,शौचालय निर्मिती इ. विषयावर जनजागृती करण्यात आली.

सर्व प्रथम राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजना काय असते? या विषयावर एक दिवशीय कार्यशाळा आयोजित केली होती.राष्ट्रीय कार्यात सहभाग आणि देशाचे ऋण कसे फेडावे याचे मार्गदर्शन मा.प्राचार्य डॉ.डी.आर.पाटील, माजी रा से यो विभागीय अधिकारी प्रा.प्रा.ए.जे. माहेश्वरी,कार्यक्रम अधिकारी प्रा.आर.एम.सूर्यवंशी,सह-कार्यक्रम अधिकारी प्रा.जी.के.बिडे,प्रा.आर.पी.महाजन व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.अनिता जाधव यांनी केले.

२१ जून अंतरराष्ट्रीय योग दिन:

रासेयो विभाग, आर. सी पटेलमहाविद्यालय व आर. सी. पटेल शैक्षणिक संकुल यांचे संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या प्रांगणात अंतरराष्ट्रीय योग दिनसाजरा करण्यात आला यावेळी संकुलात महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व विद्यार्थी, रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.

२७ जून २०२२ रोजी इतिहास विभाग आणि रा.से.यो.यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती साहू महाराज यांची जयंती "सामाजिक न्याय दिवस" म्हणून साजरा करण्यात आली.

२२ जुलै २०२२ रविवारी नियमित कार्यक्रमात नवीन प्रथम वर्षात प्रवेशित विद्यार्थ्यांना रा.से.यो.ची संकल्पना,कार्य आणि उद्दीष्ट यांची सविस्तर माहिती देण्यात आली. श्रमपरिहारा नंतर चहा नास्ता देण्यात आला. सदर कार्यक्रमास माजी रा से यो विभागीय समन्वयक प्रा. डॉ ए.जी.सोनावणे सरांनी उद्बोधन केले.

दि. ०९/०८/२०२२ देशातील मूळ निवासींना मानवी अधिकार मिळावेत तसेच त्यांच्या संरक्षणासाठी दरवर्षी 'जागतिक आदिवासी दिन' **(World Tribal Day २०२२)** साजरा करण्यात येतो. १९९३ साली UNWGIP कार्यकारिणीच्या ११ व्या अधिवेशनात मूळनिवासी घोषणेला मान्यता मिळाल्यानंतर १९९४ ला मूळनिवासी वर्ष आणि ९ ऑगस्ट 'जागतिक आदिवासी दिन' म्हणून घोषित करण्यात आले. या दिवशी महाविद्यालयाचा

मैदानात निवासींचा संरक्षणासाठी शपथ घेण्यात आली.




Oath taking on the occasion of World tribal day

१२/०८/२०२२ रोजी युवदिन साजरा करण्यात आला.शिरपूर, येथील आर. सी पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविदयालयाच्या रा. से. यो. विभाग व उप जिल्हा रुग्णालय, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य मा. डॉ. डी.आर. पाटील यांच्या मार्गदर्शनात आंतरराष्ट्रीय युवादिन साजरा करण्यात आला. या युवादिनाच्या अनुषंगाने ए.आर.टी. सेंटर, उपजिल्हा रुग्णालय यांच्या वतीने एच.आय.व्ही. (HIV) या दुर्धर रोगाविषयीची जनजागृती करण्यात आली.सर्व प्रथम युवा दिनाची शपथ घेण्यात आली. एच.आय.व्ही. रोगाच्या जनजागृती साठी रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. पोस्टरच्या माध्यमातून एच.आय.व्ही.विषयी जनजागृती करण्यात आली.



Celebration of “Har Ghar Tiranga Abhiyan”

या कार्यक्रमाचा भाग म्हणून ए.आर.टी. सेंटर, उपजिल्हा रुग्णालय चेश्री गोपाल वानखेडे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. त्यांनी आपल्या व्याख्यानात अतिशय सोप्या शब्दात एच.आय.व्ही. ची लागण कशी होते व त्या साठीच्या चाचण्या, उपचार कसा केला जातो तसेच या रोगापासून आपण आपले स्वरक्षण कसे करावे या सर्व बाबींचे सखोल मार्गदर्शन केले सदर कार्यक्रम दोन तास चालला. या कार्यक्रमास एकुण एकशे पन्नास रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते. या वेळी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ ए.जी. सोनवणे,कार्यक्रम अधिकारी आर.एम.सूर्यवंशी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी प्रा.जी.के.बिडे व महिला कार्यक्रम अधिकारी डॉ.अनिता जाधव व ए. आर. टी. सेंटर, उपजिल्हा रुग्णालयाचे श्री सतीश माळी, श्री. नानाभाऊ बडगुजर आदि उपस्थित होते.१० ते १५ ऑगस्ट २०२२ या कालावधीत “ हर घर तिरंगा “उपक्रमा अंतर्गत विद्यार्थ्यांनी

विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.



Celebration of “Har Ghar Tiranga Abhiyan”

१५ ऑगस्ट २०२२ रोजी  स्वातंत्र दिवस मोठ्या उत्साहात सादरा करण्यात आला. स्वयंसेवकांनी ध्वजाला मानवंदना दिली.कार्यक्रम महाविद्यालयाच्या प्रांगणात घेण्यात आला.

रविवारच्या नियमित कार्यक्रमात दिनांक १८ ऑगस्ट २०२२ रोजी  स्वयंसेवकांनी स्फूर्ती गीते सादर केली.विविध कला गुण सदर करण्यात आले.

०१/०९/२०२२ च्या नियमित कार्यक्रमात श्रमदान झाल्यावर कार्यक्रम अधिकारी यांनी रा. से. यो. च्या विविध योजना व व स्वयंसेवक सहभाग याच्यावर मार्गदर्शन केले.

५ सप्टेंबर २०२२ रोजी शिक्षक दिन साजरा करण्यात आला.या दिवशी रा.से.यो. स्वयंसेवकांनी शिक्षकांना पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.सदर कार्यक्रमास प्राचार्य, विभागीय समन्वयक व सर्व कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.११ सप्टेबर २०२२  रोजी स्वामी विवेकांनंदाच्या जयंती साजरी करण्यात आली.

आर. सी पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या रा. सेयो. विभागा.तर्फे राष्ट्रीय सेवा योजनादिवस (N.S.S. Foundation day) साजरा करण्यात आला.या

N.S.S.

दिवसाच्या अनुषंगाने रासेयो विभागातर्फे “उन्नत भारत अभियान” या विषयावर डॉ.एस.एम.पाटील यांनी मार्गदर्शन केले.



Covid-19 Vaccination Program

या विषयांतर्गत उन्नत भारत अभियान व महत्व सांगण्यात आले. सदर करिता उपप्राचार्य डॉ.ए.जी.सोनवणे व कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रम अधिकारी यांनी केले व आभार प्रदर्शन महिला कार्यक्रम अधिकारी प्रा अनिता जाधव यांनी केले.१३४ स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला.




AIDS Awareness Program Rally

दि २८/०९/२०२२ रोजी माजी विभागीय कार्यक्रम अधिकारी डॉ ए. जि. सोनवणे यांनी गांधीजींच्या अहिंसा मार्ग या विषयावर प्रभोदन केले. या व्याख्यांनास ७८ विद्यार्थी हजर होते.




Collection of " Nirmalya" at Arunawati River

दिनांक १४ सप्टेबर २०२२ रोजी आदरणीय अमरीश भाई पटेल यांचा ७० व्या वाढदिवसा निमित्ताने आर सी पटेल कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय शिरपूर येथे राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले.




Blood Donation Camp

२१ सप्टेंबर २०२३ आंतराष्ट्रीय शांतता दिवस म्हणून व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले ..सदरच्या व्याख्यानासाठी वक्ते म्हणून डॉ.कैलास पाटील हे लाभले.




Celebration of International Peace Day

दि ०१/१०/२०२२ रोजी गांधीजींच्या जीवनावर प्रकशित २०० पुस्तकांची प्रदर्शनी लावण्यात आली. होती. या प्रदर्शनीचे उद्घाटन प्राचार्य डॉ डी.आर.पाटील यांनी केले. सदर प्रदर्शनी चे संपूर्ण नियोजन रा से यो स्वयसेवकांनी व ग्रंथपाल रत्नेश्वर भावसार यांनी केले.यात ४० स्वयंसेवकांनी सहभाग नोद्विला.

दि.०२/१०/२०२२रोजी गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्यांच्या हस्ते करण्यात आले या वेळी रासेयो कार्यक्रम अधिकारी, सर्व शिक्षक व रासेयो स्वयंसेवक हजर होते.या

गांधीजींच्या १५० व्या जन्म शताब्दी वर्षाच्या निमित्ताने महाविद्यालयात व्याख्याने व चर्चासत्रे आयोजित करण्यात आली.

३१ ऑक्टोबर २०२२ या दिवशी रा.से.यो.तर्फे "राष्ट्रीय एकता दिवस" साजरा करण्यात आला. कार्यक्रमात तालुका समन्वयकप्रा.ए.जी सोनवणे यांनी सोबत मिळून शपथ घेण्यात आली व मार्गदर्शन केले.रन फोर युनिटी दिनानिमित्त प्लोग्गिंग रन करून स्वयंसेवकांनी रस्त्याच्या दुतर्फा साफसफाई केली.

२६ नोव्हेंबर २०२२ गुरुवार रोजी "संविधान दिवस" साजरा करण्यात आला. १ डिसेंबर २०२२ रोजी "जागतिक एड्स दिवस" निमित्त भव्य रैली चे आयोजन करण्यात आले. या साठी उपजिल्हा रुग्णालय शिरपूर, ए. आर.टी. सेंटर यांचा चमू हजर होता. स्वयंसेवकांना Banner व पोस्टर यांच्यासह महाविद्यालय करवंद नाका व उपजिल्हा रुग्णालय व सभोवताल परिसरात रैली काढून एड्स ची जनजागृती करण्यात आली.

०५ डिसेंबर २०२२ रोजी जागतिक स्वयंसेवक दिवस साजरा करण्यात आला.

१२ जानेवारी २०२३ ला जागतिक युवा दिन साजरा करण्यात आला. या निमित्त पोस्टर निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यास भरभरून प्रतिसाद मिळाला.०८ जानेवारी २०२३ च्या नियमित कार्यक्रमात श्रमदान झाले व शिबिरार्थी विद्यार्थांनी आपले अनुभव सांगितले.

१५ जाने. २०२३ च्या नियमित कार्यक्रमात गीते सदर झाली. श्रमदान झाले.गणराज्य दिवस २६ जानेवारी रोजी महाविद्यालयाच्या पटांगणावर मानवंदना देवून साजरा करण्यात आला.सर्व रा.से.यो.स्वयंसेवक हजर होते.२७ जानेवारी नियमित कार्यक्रमात प्रा गोपाल बिडे सहा.कार्यक्रम अधिकारी यांनी मार्गदर्शन केले.३० जानेवारी २०२३ ला "हुतात्मा दिवस" साजरा करण्यात आला.

०५ फेब्रुवारी २०२३ ला मतदार दिवस हा कार्यक्रम, आर सी पटेल महाविद्यालयाच्या रासेयो विभागाने साजरा केला. यावेळी माजी विभागीय समन्वयक डॉ. ए.जी. सोनावणे यांनी मतदानाचे महत्व विषद केले.सर्व सहभागींनी मतदार दिवसाला शपथ घेतली.

१२ फेब्रुवारी २०२३ रविवारी नियमित कार्यक्रमात महाविद्यालयाच्या पटांगण साफ करण्यात आले.विविद बौद्धिके घेण्यात आली.टाळ आणि मृदुंगाच्या तालावर गीते सादर करण्यात आली. अल्पोपहार देण्यात आला.

दिनांक ८ मार्च २०२३ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थिनींसाठी रा से यो विभागामार्फत डॉ.तसलीम जळगाव वाला मॅडम तसेच शिरपूर पोलीस स्टेशनचे पी आय श्री ए एस आगरकर यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते .कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.आर पाटील सर होते.




Celebration Of International Woman Day

१५/०१/२०२३ च्या नियमित कार्यक्रमात शिबीर कालावधी माननीय प्राचार्यांच्या परवानगीने आणि रा.से.यो.व क.ब.चौ.उ.म.वि.जळगाव यांच्या पूर्व परवानगीने २७ जानेवारी २०२३ ते ०२ फेब्रुवारी २०२३ असा ठरविण्यात आला.त्या साठीची पूर्वतयारी पूर्ण करण्यात आली. या सात दिवसीय निवासी शिबिरात विविध

सामाजिक विषयावर व्याख्यान घेण्यात आले.तसेच बाळदे गावात जाऊन साफसफाई,जनजागृतीपर कार्यक्रम घेण्यात आले.विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबीर मोठ्या उत्साहात पार पडले.१२५ रा.से.यो.विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. १९ मार्च २०२३ ला दोन वर्ष पूर्ण झालेल्या रा.से.यो.विद्यार्थ्यांना १६३ अन्वये १० मार्क मिळण्यासाठी सूचना देण्यात आल्या. कार्यक्रमानंतर अल्पोपहार देण्यात आला.

**@वर्तमानपत्राचे/वृत्तपत्राचे निवडक कात्रण@**

**News**

**देशोन्नती**

## पटेल कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संविधान दिवस

देशोन्नती वृत्तसंकलन...

**शिरपूर** ▫ आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आले. राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख व्हावी या उद्देशाने राज्यशास्त्र, मानसशास्त्र व मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रश्नमंजुषेचेही आयोजन करण्यात आले होते. या प्रश्नमंजुषेमध्ये संविधान संदर्भातील विविध प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आले. कार्यक्रमाला



कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. रमेश जाधव, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. राम सूर्यवंशी, प्रा. गोपाल भिडे, डॉ. सुधाकर चौधरी, डॉ. मिलिंद बचुटे, डॉ. प्रल्हाद मगरे, डॉ. अनिल सोनवणे व महाविद्यालयातील विद्यार्थी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रामसिंग वसावे यांनी केले. डॉ. रमेश जाधव यांनी विद्यार्थ्यांकडून संविधान उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करून घेतले. अध्यक्षीय भाषणात डॉ. डी. आर. पाटील यांनी भारताचे संविधान हा एक सामाजिक दस्तऐवज आहे व त्याची माहिती सर्वांनी करून घेणे गरजेचे आहे असे आवाहन केले. आभार डॉ. सुधाकर चौधरी यांनी मानले.

Deshonnati Edition
Dec 1, 2022 Page No. 3
Powered by : eRelego.com

(४) महाराष्ट्रातील पहिले ग्रामीण दैनिक — दैनिक राष्ट्रउदय

## पटेल महाविद्यालयात संविधान दिवस उत्साहात

***शिरपूर***

येथील आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात संविधान दिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

यानिमित्त संविधानाच्या उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन विद्यार्थ्यांकडून करून घेण्यात आले. राज्यशास्त्र विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख व्हावी या उद्देशाने राज्यशास्त्र, मानसशास्त्र व मराठी विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन प्रश्नमंजुषेचेही आयोजन करण्यात आले होते. या प्रश्नमंजुषेमध्ये संविधान संदर्भातील विविध प्रश्न विद्यार्थ्यांना विचारण्यात आले.

कार्यक्रमाला कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील, उपप्राचार्य डॉ. रमेश जाधव, उपप्राचार्य डॉ. अरुण पाटील, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. राम सूर्यवंशी, प्रा. गोपाल भिडे, डॉ. सुधाकर चौधरी, डॉ. मिलिंद बचुटे, डॉ. प्रल्हाद मगरे, डॉ. अनिल सोनवणे व महाविद्यालयातील विद्यार्थी या कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. रामसिंग वसावे यांनी केले. डॉ. रमेश जाधव यांनी विद्यार्थ्यांकडून संविधान उद्देश पत्रिकेचे सामूहिक वाचन करून घेतले. अध्यक्षीय भाषणात डॉ. डी. आर. पाटील यांनी भारताचे संविधान हा एक सामाजिक दस्तऐवज आहे व त्याची माहिती सर्वांनी करून घेणे गरजेचे आहे असे आवाहन केले. आभार डॉ. सुधाकर चौधरी यांनी मानले.

युनायटेड खान्देश 12 मार्च 2023

# आर. सी. पटेल पटेल कला, वाणिज्य व विज्ञान कॉलेजमध्ये महिला दिवस साजरा



शिरपूर : आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात महिला दिनी कार्यक्रम जाला. यावेळी शिरपूर शहर पोलीस निरीक्षक ए. एस. आगरकर व सामाजिक कार्यकर्ते तस्निम जळगाववाला प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

अध्यक्षस्थान महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील यांनी भूषविले. प्रथम सत्रात ए. एस. आगरकर यांनी विद्यार्थिनींना महिला दिनानिमित्त संदेश दिला. मुलींनी मोबाईल पासून दूर रहावे. करिअर कडे लक्ष द्यावे. आकर्षणरुपी प्रेमाच्या जाळ्यात न अडकता करिअरचे भान ठेवले पाहिजे, असा संदेश दिला.

द्वितीय सत्रात समाजसेविका तस्निम जळगाववाला यांनी महिला सबलीकरण म्हणजे महिलांनी सबल झाले पाहिजे, त्याचबरोबर संस्कारही जपले पाहिजेत असे सांगितले. प्राचार्य डॉ. डी. आर. पाटील यांनी महिलांनी सबल, कर्तुत्ववान प्रामाणिक, आत्मविश्वास व नैतिक मूल्य जपत करिअरची संधी शोधली पाहिजे, असे सांगितले. प्रास्ताविक डॉ.अनिता जाधव यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. हर्षदा पाटील यांनी केले. आभार डॉ. वंदना पाटील यांनी मानले. यशस्वीतेसाठी डॉ. जे. पी. महाशब्दे, डॉ. अनिता मोरे, प्रा. रामकुमार सूर्यवंशी, प्रा. गोपाल बिडे, गणेश सोनार, संजय मोरे, बन्सीलाल चौधरी, मेहुल गुजराथी, संदेश राजपूत यांनी प्रयत्न केले.

Programme officer
National Service Scheme
.C. Patel Arts, Com. & Sci. Colle
Shirpur, Dist. Dhule

प्रा.आर.एम.सूर्यवंशी

रासेयो कार्यक्रम अधिकारी

N.S.S.